# क्षणचित्रे

## नावापुर नगरपरिषदेच्या करोना प्रादुर्भाव प्रतिबंध सर्वेक्षणासाठी स्वयंसेवकांचे प्रशिक्षण



स्वयंसेवकांना प्रशिक्षण देताना डॉ.कोकणी



सर्वेक्षण दरम्यान नागराद्याक्षा, प्रत्येक प्रभागातील नगरसेवकानसोबत कार्यक्रमअधिकारी व स्वयंसेवक



सर्वेक्षण करताना स्वयंसेवक



सर्वेक्षण करताना स्वयंसेवक

## मास्क तयार करताना स्वयंसेवक





गरजूंना मास्क वाटप



गरजूंना मास्क वाटप करताना स्वयंसेवक



गरजूंना मास्क वाटप करताना स्वयंसेवक

## लॉकडाऊन काळात गरजूंना मदत




गरजूंसाठी २०० किलो तांदूळ देताना डॉ.छाया गावित



हात मजुरांना खिचडी वाटप करताना स्वयंसेवक



नगरपालिकेतील सफाई कर्मचार्यांना धान्य वाटप करताना मा.आरिफभाई बालेसरीया



नगरपालिकेतील सफाई कर्मचार्यांना धान्य वाटप करताना डॉ.छाया गावित,प्रा.मुळे व प्रा.गेडाम

आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था


# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

## नवापूर जि. नंदुरबार

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने
कोरोना जनजागृती अभियान पत्रक.

## :: कोरोना (कोव्हीड-१९) आजाराची लक्षणे ::

ताप, खोकला, सर्दी, श्वास, घेताना, त्रास, न्युमोनिया
आजार होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी.



- शिंकताना किंवा खोकताना नाकासमोर रुमाल अथवा टिशू पेपर धरावा.
- घराबाहेर पडताना मास्कचा वापर करावा.
- वारंवार आपले हात स्यांनीटायझर, साबण व पाण्याने स्वच्छ धुवावेत.
- डोळे, नाक, कान व तोंडाला वारंवार स्पर्श करु नये.
- कोरोनाग्रस्त अथवा संशयित तसेच प्रत्येक व्यक्ती पासून किमान तीन फुट लांब राहा.
- सामाजिक अंतर ठेवावे, कोठेही गर्दी करु नये.
- डॉक्टर, पोलिस, आरोग्य कर्मचारी व सफाई कर्मचारी तसेच प्रशासनास मदत करा.
- अफवांवर विश्वास ठेवू नका व अफवा पसरवू नका.
- विनाकारण घराबाहेर पडू नका.
- सार्वजनिक ठिकाणी किंवा उघडयावर थुंकू नका.
- सकस आहार, योग्य व्यायम व पुरेशी झोप घ्या.
- स्वतःचे व इतरांचे आजारी पडण्यापासून संरक्षण करा.
- आजाराची लक्षणे दिसल्यास किंवा संशय आल्यास स्थानिक शासकिय वैद्यकिय हॉस्पिटलशी संपर्क साधावा.
- गरीब व गरजु लोकांना मदत करा.
- प्राणी व पक्ष्यांना अन्न व पाणी द्या.
- आरोग्य सेतू आयप डाऊनलोड करा व इतरांना त्याबद्दलची माहिती द्या.

## अडचणी व समस्या संदर्भात खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

राष्ट्रीय कॉल सेंटर  +91-11-2397 8046
राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष : 020-26127394
टोल फ्री क्रमांक : 104

पोलिस स्टेशन : 100
नवापूर तालुका समन्वयक किंवा
तहसीलदार : 9922664212
नवापूर प्राथमिक आरोग्य केंद्र : 02569-250250

**घरी रहा.... सुरक्षित रहा....**


प्रा. ए. एफ. पाटील
स्मन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

डॉ.श्रीमती छाया गावीत
समन्वयक राष्ट्रीय सेवा योजयना

डॉ. ए. जी. जयस्वाल
प्राचार्य

# ऋत्तपत्रातील कात्रणे

## राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी नवापूरात आरोग्याची माहिती गोळा करणार



नवापूर– शहरातील कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी हे नवापूर शहरातील नागरीकांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्या कामी माहीती गोळा करणे या बाबतचे प्रशिक्षण गटविकास नंदकुमार वाळेकर, तालुका आरोग्य अधिकारी यांनी दिले आहे.

काल या सर्व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व प्राध्यापक छाया गावीत यांना नवापूर नगरपालिकेत मुख्यधिकारी राजेंद्र नजन यांनी योग्य त्या सुचना देऊन एकुण ३० विद्यार्थी यांना हात मोजे, मास्क, सेनिटाइज नवापूर नगरपालिकेतर्फे देण्यात आले.यावेळी नगराध्यक्ष हेमलता पाटील, उपनगराध्यक्ष आरीफ पालावाला, गटनेता आशिष मावती, विरोधी पक्षनेता नरेंद्र नगराळे, नगरसेवक खलील खाटीक, माजी नगरसेवक अजय पाटील, अमृत लोहार, मुख्यधिकारी राजेंद्र नजन, प्रशासकीय (पान ४ वर)

## नवापूर शहरातील नागरीकांची आरोग्य तपासणी व माहितीसाठी एनएसएसच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

### ३० विद्यार्थ्यांचा सहभाग, नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन



**नवापूर (प्रतिनिधी)** - नवापूर शहरातील कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी हे नवापूर शहरातील नागरीकांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्या कामी माहीती गोळा करणे या बाबतचे प्रशिक्षण गटविकास नंदकुमार वाळेकर, तालुका आरोग्य अधिकारी यांनी दिले आहे.

आज या सर्व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व प्राध्यापक छाया गावीत यांना नवापूर नगरपालिकेत मुख्यधिकारी राजेंद्र नजन यांनी योग्य त्या सुचना देऊन एकुण ३० विद्यार्थी यांना हात मोजे,मास्क,सेनिटाइज नवापूर नगरपालिके तर्फे देण्यात आले.यावेळी नगराध्यक्ष हेमलता पाटील,उपनगराध्यक्ष आरीफ पालावाला,गटनेता आशिष मावती,विरोधी पक्षनेता नरेंद्र नगराळे,नगरसेवक खलील खाटीक,माजी नगरसेवक अजय पाटील,अमृत लोहार,मुख्यधिकारी राजेंद्र नजन,प्रशासकीय अधिकारी अनिल सोनार,मिलिद भामरे,आरोग्य निरीक्षक राजेंद्र चव्हाण आदी उपस्थित होते.या विद्यार्थानी नवापूर शहरात आरोग्य तपासनी कामी माहीती गोळा करण्याचे काम सुरु केले आहे.लोकांना याकामी सहकार्य करावे असे आव्हान करण्यात आले आहे.

जळगाव तरुण भारत

Main Edition | 2020-04-16 | Page- 7

## वरिष्ठ महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग



**नवापूर** : नगरपरिषदेच्या कोरोना प्रादुर्भाव प्रतिबंध सर्वेक्षणात येथील वरिष्ठ महाविद्यालयातील रा.से.यो.च्या स्वयंसेवकांची मोलाची मदत होऊ शकते असे संस्थेचे कार्याध्यक्ष व नवापूर विधानसभेचे आ. शिरीषकुमार नाईक यांनी सुचविले. यांच्या सूचनेनुसार रासेयो योजनेच्या समन्वयक डॉ. छाया गावित त्यांनी स्वयंसेवकांची यादी तयार करून नगर परिषदेच्या अध्यक्षा हेमलता पाटील, गटविकास अधिकारी नंदकुमार वाळेकर व वैद्यकीय अधिकारी डॉ. कोकणी यांच्याशी चर्चा करून या स्वयंसेवकांना प्रशिक्षण देऊन त्यात कोरोना विषाणू संदर्भात माहिती देण्यात आली. सर्वेक्षणादरम्यान संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले व सर्वेक्षण दरम्यान सोशल डीस्टांसिंग, मास्क लावणे, स्यानीटायझरचा वारंवार उपयोग ई. बाबतीतील जनजागृतीवर देखील उद्बोधन करण्यात आले. लॉक डाऊनच्या काळात सर्वेक्षणासाठी पुढे येऊन रासेयोच्या स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकी जपतजी सामाजिक कार्याची आवड दाखवली त्याबद्दल आ.शिरीषकुमार नाईक, आदिवासी सेवा सहायक व शिक्षण प्रसारक संस्थेच्या सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ.ए.जी.जायसवाल व उपप्राचार्य डॉ.ए.बी.महाजन, प्रा.वाय.जी. भदाने, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्यातर्फे कौतुक केले जात आहे.



**नवापूर : गटविकास अधिकारी नंदकुमार वाळेकर यांना एक हजार मास्क देताना आमदार शिरीषकुमार नाईक, आरीफभाई बलेसरिया, तानाजी वळवी, डॉ. हरिशचंद्र कोकणी आदी.**

## आमदार नाईकांकडून एक हजार मास्क

**नवापूर** : 'कोरोना व्हायरस'चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी काम करणारे आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना मास्कचा तुटवडा असल्याची माहिती मिळताच आमदार शिरीषकुमार नाईक यांनी एक हजार मास्कची तातडीची मदत केली. बहुतांश आरोग्य कर्मचारी तोंडाला रुमाल बांधून सेवा बजावत होते. या मास्कमुळे काहीशी अडचण दूर होणार आहे. नवापूर उपजिल्हा रुग्णालय, विसरवाडी व खांडबारा ग्रामीण रुग्णालय, नवापूर तालुक्यातील नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४६ आरोग्य उपकेंद्रांतील डॉक्टर, परिचारिका, आरोग्यसेवक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, अशा शेकडो कर्मचाऱ्यांना मास्क देण्यात आले.

# नवापूर नगरपरिषद कार्यालय,नवापूर.जि.नंदुरबार.

फोन नं.(०२५६९) २५००५०,२५०१००,२५०७५० ईमेल आयडी. conp.nvpur@gmail.com

दिनांक :-१५/०४/२०२०

## परीपत्रक.

नवापूर नगरपरिषदेने शहरात कोरोना (कोव्हीड-१९) या संसर्गजन्य रोगाचे विषाणू प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्रत्येक प्रभागात नागरीकांचे सर्व्हेक्षणाचे काम राष्ट्रीय सेवा योजनेचे (कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,नवापूर) विद्यार्थ्यामार्फत करण्यात येत आहे.

सदरचे विद्यार्थि आपल्या भागात सर्व्हेक्षणास आल्यास त्यांनी विचारलेली माहिती त्यांना देण्यात यावी. याकामी नगरपरिषदेस सहकार्य करावे ही विनंती . याबाबत अधिक माहिती आपल्या प्रभागाचे नगरसेवक यांच्याकडुन घेण्यात यावी. पोलीस विभागाने याकामी सदर विध्यार्थांना सहकार्य करावे.

नवापूर नगरपरिषद स्थापना ११/११/८ नवापूर, जि. नंदुरबार

मुख्याधिकारी,
नवापूर नगरपरिषद,नवापूर.